MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. II



## VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor

Dr.B.K.Shep
Dr.R.D.Rathod
Dr.K.M.Bhange

14) महाराष्ट्रातील भटक्या - विमुक्त जाती जमाती यांची जीवन पद्धती
**प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे, सोनपेठ, जि.परभणी** ||41

15) वंजारी समाज : सद्यस्थिती आणि आव्हाने
**प्रा.डॉ.पी.एल. कराड, परळी-वै. जि.बीड** ||43

16) उपेक्षित भटका समाज : एक अभ्यास
**डॉ. व्ही. बी. लांब & सौ. अनुराधा प्रशांत पवार (गोरे), ता. मिरज, जि.सांगली** ||44

17) आदिवासी जमातींसमोरील समस्या
**प्राचार्य. डॉ. अरुण दळवे, घाटनांदुर, ता. अंबाजोगाई, जि. बीड** ||47

18) मागासवर्गीयांसाठी नेमण्यात आलेल्या मंडल आयोगाच्या शिफारसी संदर्भात लोकनेते ...
**डॉ. बाळासाहेब मुंडे, अंबाजोगाई** ||49

19) महाराष्ट्रातील विमुक्त - भटक्या जाती - जमाती व इतर मागासवर्गीयांची सद्यस्थिती
**डॉ. दिलीप सिताराम मस्के, अंबाजोगाई** ||51

20) महाराष्ट्रातील विमुक्त- भटक्या जाती-जमाती मधील स्त्रियांची सद्यस्थिती.
**प्रा. डॉ.शशिकांत मुकुंदराव आलटे, शिराढोण, ता.कळंब जि.उस्मानाबाद** ||53

21) विमुक्त—भटक्या जाती—जमाती व इतर मागासवर्गीयांचे प्रश्न व राजकिय नेत्रत्वाचे कार्य
**प्रा.डॉ.खोकले अविनाश कोंडिबा, गंगाखेड, जि.परभणी** ||55

22) महाराष्ट्रातील बंजारा समाजाची सद्यस्थिती
**प्रा.रामराव चव्हाण, नळेगाव, ता.चाकूर जि. लातूर** ||58

23) महाराष्ट्रातील विमुक्त-भटक्या जाती-जमाती व मागासवर्गीयांच्या विकासात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे योगदान
**एम.एस.ढाकणे, जालना** ||60

24) भटक्या विमुक्त जाती – जमातीच्या स्त्रीयांचे वास्तव
**प्रा. डॉ. डी. एच. मेहत्रे, मुदखेड** ||61

25) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
**प्रा.नंदकुमार बी.कुकलारे, देवगांव (रं) ता. कन्नड, जि.औरंगाबाद** ||63

26) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान
**प्रा. दिलीप हरसिंग राठोड, ता. पारोळा जि. जळगाव** ||66

27) विमुक्त-भटक्या जाती-जमातीतील स्त्रियांमधील अंधश्रद्धाविषयक दृष्टीकोणाचा : समाजशास्त्रीय अभ्यास
**प्रा.डॉ. पाटील एस.व्ही. & प्रा.डॉ. मुंडे रामकिशन हरिदास, ता. पैठण, जि. औरंगाबाद** ||68

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

14

# महाराष्ट्रातील भटक्या - विमुक्त जाती जमाती यांची जीवन पद्धती

**प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे**
संशोधन मार्गदर्शक,सहयोगी, प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि.परभणी

**********

**प्रस्तावना (Introduction) :-**

भारत हा देश प्रचंड जातीनी भरलेला आहे. रोज नव्या नव्या जाती कुठेतरी तयार होतात. आहार, संस्कार व प्रदेशावरुन अशा कारणावरुन जाती निर्माण होतात. जाती ही मराठी संज्ञा 'जन' या संस्कृत धातूपासून बनली असून तिचा अर्थ 'जन्म' असा होतो. जाती या संज्ञेचा प्रतिशब्द Caste हा इंग्रजी भाषेतील असून हा शब्द Casta या पोर्तुगीज भाषेतील शब्दावरुन बनला आहे. डॉ. गो. स. घुर्ये यांच्या मते, प्रत्येक भाषिक प्रदेशात २०० जाती - गट असून ३००० पोट जातीत (Sub caste) विभाजन झाले आहे. प्रत्येक जातीत साडेबारा पोट जाती असतात. जातीची रचना उतरंडी सारखे असते. व्यक्ती ज्या जातीत जन्माला येते त्या जातीची म्हणून निर्देशिली जाते. प्रत्येक जातीचा एक व्यवसाय असतो. तो पिढ्यानपिढ्या चालत असतो. ग्रामीण जीवनात भांडणे, बेबनाव, धोरणात्मक निर्णय घेण्याचे कार्य जाती पंचायती करीत. प्रत्येक जाती पोटजातीची पंचायत असते. भटक्या समूदायाच्या पंचायती होत असतात. ह्या पंचायती यात्रेच्या प्रसंगी बोलाविण्याचे निश्चित कार्यक्षेत्र होते. जातिपंचायतीने दिलेला निर्णय दोन्ही पक्षांना बंधनकारक असते. जाती बाहेर टाकणे, जातीबांधवांना भोजन देणे अशा प्रकारचा दंड लावण्यात येई.

ग्रामीण भागात भटक्या जाती राहतात जीवन जगताना ते लोक भविष्य कथन करणे, औषधे तयार करणे, विविध खेळ इ. करतात. भटक्या जाती गावाला लागून असलेल्या मोकळ्या जागेवर पालांमध्ये किंवा उघड्यावर जीवन घालवित असत. या भटक्या जातीत घिसाडी, बेलदार, वड्डर, कैकाडी, वंजारी, लमाण, वैदू, गारूडी, कोल्हाटी, दरवेशी, वाघ्यामुरळी, पोतराज, नंदी बैलवाले इत्यांदीचा समावेश होता. ग्रामीण सांस्कृतीक जीवनात त्यांचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण होते. उदरनिर्वाहासाठी शोधार्थ भटकत राहणाऱ्या समाज गटांना 'भटक्या जमाती' असे म्हणतात.

भटक्या - विमुक्त जमाती हजारो वर्षापासून उपेक्षित, दुर्लक्षित, अस्थिर व असुरक्षित जीवन जगत आहेत. या जमाती अज्ञान, रुढी - परंपरा, अंधश्रद्धा, दैवा धीनता यांच्या दुष्टचक्रात अडकलेल्या आहेत. भटक्या - विमुक्त जाती उदरनिर्वाहासाठी भटकताना दिसतात. पारंपारिक गावगाड्याच्या उत्पादन व्यवस्थेत या भटक्या विमुक्त जातीच्या लोकांना कोठेही स्थान मिळाले नाही. तसेच आधुनिक शहरी व ग्रामीण औद्योगिक संस्कृतीच्या उत्पादन व्यवस्थेतही या जमातीना सामावून घेतले नाही. त्यामुळे चो-या करणे, स्थापीत लोकांचे मनोरंजन करणे, प्राणावर बेतणाऱ्या कसरती करणे, भीक मागणे, यासारखी कामे करावी लागतात. प्रत्येक जमातीची वेगवेगळी सांकेतिक भाषा निर्माण केली. शिक्षण नसल्यामुळे सामाजिक सुधारणांचा आधुनिक बदलांचा त्यांना गंध नाही. या जमाती गावोगाव पाले ठोकून जगत आहेत. उघड्यावरचा, असुरक्षीत जीवन व्यवहार ही नित्याचीच बाब झाली आहे. दैववादातून विविध प्रकारच्या अंधश्रद्धा त्यांच्यामध्ये निर्माणझाल्याचे दिसून येतात.

**संशोधनाचे उद्देश :-**

संशोधनाचे उद्देश खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

१. भटक्या - जमाती संकल्पना स्पष्ट करणे.
२. भटक्या - विमूक्ताची जीवन पद्धतीचा अभ्यास करणे.
३. महाराष्ट्रातील आरक्षणाची सद्यस्थिती दर्शविणे.
४. भटक्या - विमूक्तांच्या चळवळीचा अभ्यास करणे.
५. निष्कर्ष काढणे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**संशोधनाची गृहितके :-**

संशोधनाची गृहितके खालीलप्रमाणे ठरविण्यात आली.

१. भटक्या - विमूक्त जातीतील लोक अजूनही रूढी परंपरा व आपला पारंपारिक व्यवसाय सोडायला तयार नाहीत.
२. यांच्यात जातपंचायतीचा प्रभाव अजूनही दिसून येतो.
३. भटक्या विमूक्तातील लोक भटकत असतात.

**अभ्यास पद्धती :-**

सदर शोध निबंधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यात संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील लेख, मासिके, इंटरनेट इ. चा वापर करुन वरील निश्चित उद्देशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**भटके :-**

पिकांच्या सुगीच्या दिवसात त्याकाळी काही लोक धर्माच्या नावावर भटकंती करत असत. हे फिरणारे गात असत व एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी अशी सतत भ्रमंती करत असत. धर्माच्या नावाने भीक मागत फिरणारे हे सर्व जाती - जमातीमधील असत. या लोकांची लग्नात, बारश्याच्यावेळी, नामकरण, समारंभावेळी आणि इतर समारंभावेळी उपस्थिती राहायची. भटक्या जातीना गाववाड्यात स्थान नव्हते. आज इथे उद्या तिथे अशी त्यांची अवस्था होती. ते सतत भटकत असत. बंजारा, कैकाडी, राजपूत भामटा, रकासी भामटा, कंजार भाट, बेरड, मांग, गारूडी, फासेपारधी, छप्परबंद, कोल्हाटी, वड्डर इत्यादी जाती भटक्या होत्या. या जातीना गुन्हेगार जाती म्हणून संबोधन्यात आले होते. शाहू महाराजांनी या भटक्या जातीना जागा देवून एका ठिकाणी स्थिर केले. त्यांना गुन्हेगारी मार्गापासून प्रवृत्त करून सन्मार्गाला लावले. फासेपारधी लोकांना आपल्या सेवेत नोकरीवर घेवून पहारेकरी केले. यांना जमीनी इनाम म्हणून दिल्या. पहारेकऱ्याचीही यांना कामे देण्यात आली.

महाराष्ट्रात विमुक्त जातीची संख्या १४ असून या प्रवर्गास ३ % आरक्षण आहे. या प्रवर्गात बेरड, बेस्तर, भामटा, कैकाडी, कंजारभाट, कटाबू, बंजारा, राजपारधी, राजपूत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद या आहेत.

**भटक्या विमुक्तांची चळवळ :-**

महाराष्ट्रात एकूण ४२ भटक्या विमुक्त जाती आहेत. त्यापैकी २८ भटक्या आणि १४ विमुक्त आहेत. या ४२ जमातीच्या पोटजातीची संख्या सुमारे दोनशे आहे. रुढी, परंपरा, भाषा, व्यवसाय, संस्कृती आणि प्रादेशिक कारणाने

ह्या जमातीत सारखेपणा नाही. प्रत्येक जमातीची भाषा वहिवाट आणि चालीरिती यात भिन्नता आढळते.

विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना इंग्रजी राजवटीत अनेक बंधने घालण्यात आली होती. या जमाती सतत भटकणाऱ्या आहेत. या जमातीतील लोक चोऱ्या करतात म्हणून लोकांमध्ये संशय व भितीचे वातावरण होते. ब्रिटीशांनी १८७१ मध्ये कायदा करुन चोरी करुन उपजीविका करणाऱ्या लोकांच्या जमातींना गुन्हेगार जमाती म्हणटल्या जाऊ लागले. या गुन्हेगार जमातीच्या भटकण्यावर बंधने लादून त्यांना एका ठिकाणी बंदिस्त तारेच्या कुंपनात डांबण्यात आले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर हे गुन्हेगारी कायदे १९५२ मध्ये रद्द करुन गुन्हेगार जमातींना विमुक्त करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात विमुक्त भटक्या समाजाच्या संघटना अस्तित्त्वात आल्या. या संघटनांची कामे आपल्या जमातीपुरतीच मर्यादित होती. 'उपरा' हे लक्ष्मण माने यांचे आत्मचरित्र प्रकाशित झाले. त्याला खूप प्रसिद्धी मिळाली. लक्ष्मण माने व बाळकृष्ण रेणके यांनी विमुक्त जातीची संघटना स्थापन झाली. सभा, परिषदा, मोर्चे आणि सत्याग्रह अशा कार्यक्रमामधून आपली संघटना बांधली. १५ ऑगस्ट, १९८६ रोजी विमुक्त भटक्यांची शोधयात्रा निघाली ही शोधयात्रा लातूर, उमरगा, सोलापूर, पुणे आणि मुंबई ह्यामार्गे गेली. या शोधयात्रेत विमुक्त जाती व भटक्या जमातील लोक आपल्या पारंपारिक वेशभुषेत सहभागी झाले होते. साप - गारूडी आपल्या गळयात घालून, बहुरूपी पोलीसांच्या नकली वेष धारण करून, मसणजोगी भगवी वस्त्रे घालून ह्या शोधयात्रेत आलेली होती. या शोधयात्रेचे गावोगावी स्वागत करून आर्थिक मदत केली. सत्कार केले. भटक्या विमुक्तांचे प्रश्न गावोगावी सभा घेवून मांडू लागले. भटक्या - विमुक्त जमातीतील लोक आजही भटकत आहेत त्यांची खालीलप्रमाणे आपणास वैशिष्ट्ये सांगता येतील.

**१. भटकंती :-**

भटक्या - विमुक्त जमातीच्या लोकांना स्वत:चे गाव नाही. त्यांच्या नावावर गुंटासुद्धा जमीन नाही. देशाचे नागरिक म्हणून नोंद नाही. आज इथं तर उद्या दुसरीकडं असा प्रवास असतो. जागा मोकळी दिसली की पाल टाकने आणि चार दिवस राहून आणि पुन्हा दुसऱ्या गावाला निघने हा त्यांचा नित्यक्रम सुरु असतो. मनोरंजन करणे, वैद्यकीय गरज भागविणे, भिक्षेवर या जमाती उदरनिर्वाह करीत राहतात.

**२. भाषा**

प्रत्येक जमात ही संख्येने कमी आहे. त्यांचे दैनंदिन व्यवहार गुप्त व सांकेतीक भाषेत चालतात. प्रत्येक जमातीची आणि तिच्या पोटजातीची गुप्त व सांकेतीक भाषा असते. स्थिर समाजाला आपले व्यवहार, आपले जगणे समजू नये या उद्देशानं प्रत्येक जमातीने वेगवेगळी भाषा जतन केल्याचे दिसून येते.

**३. जात पंचायत :-**

भटक्या - विमुक्त जमातीमधील प्रत्येक जमातीमध्ये आणि तिच्या पोटजातीमध्ये जातपंचायतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. या जमातीचा जीवन व्यवहार हा जात पंचायती मार्फतच नियंत्रित केला जातो. जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्व व्यवहार ही जात पंचायत आपल्या ताब्यात ठेवते. आपल्या जमातीचे वेगळे अस्तित्व टिकवून ठेवण्यात या जात पंचायतीचा महत्त्वाचा वाटा असतो. जमातीचे नियम कायदे मोडू नयेत ही जातपंचायत कठोरात कठोर आणि अघोरी शिक्षा करीत असते. या भितीमुळे जात पंचायतीचे निमय मोडत नाहीत.

**निष्कर्ष :-**

विमुक्त भटक्या जमातीच्या लोकांना ना गाव ना घर. आज इथं उद्या तिथं अशी त्यांची अवस्था असते. जीवन जगण्यासाठी भीक मागणे, चोरी करणे, जादूचे कसरतीचे प्रयोग करणे, साप, माकड, नंदी बैल व पोपट ह्या प्राण्यांचा खेळ करुन उदरनिर्वाह चालविणे, भविष्य सांगणे, नाडी परीक्षा करणे, औषधी वनस्पती विकणे, सुया, पिणा, बिब्बे, काळया मण्या, पोत, उखळ, पाता, खलबता, सूप, दुरडी, टोपली अशा वस्तू विकून उपजिवीका करणे असा जीवनक्रम ह्या जमाती जगतात. या जमातीकडे लोक संशयाने पाहात असल्यामुळे गावात काम मिळत नाही.

भटक्या विमुक्त जमातींना सेवा सुविधा, सवलती देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा आग्रक्रमाने प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी राजकीय आणि शासकीय व्यवस्थेमध्ये त्यांच्याविषयी जिव्हाळा, आत्मीयता आणि वंचीत समूह गटाविषयीची व्यापक दृष्टी असणे आवश्यक आहे. जाती व्यवस्थेच्या उतरंडीत या जमाती येत नसल्यामुळे या जमातीना अस्पृश्य मानले गेले नाही. या जमातीतील कोणी भविष्य सांगून, कोणी गोंधळ व जागरण करुन आपली गुजराण करीत होते. मनोरंजन करणारे भटके समाजाच्या मनोरंजनाची गरज भागवत होते. नुकतेच राज्यशासनाने भटक्या - विमुक्तांमध्ये पसरलेली अस्वस्थता लक्षात घेवून भटक्या - विमुक्त समाजाच्या अनेक योजनांसाठी भरीव निधी देण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला.

**संदर्भ ग्रंथी सूची :-**

१. डॉ. अनिल कठारे व इतर : महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळी चा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

२. डॉ. भा. कि. खडसे व इतर : जाति व्यवस्था व अर्थव्यवस्था ग्रामीण समाजशास्त्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

३. प्रा. अविनाश जेळस व इतर : सामाजिक चळवळी : अस्पृश्यता निवारण, दलित, शेतकरी व कामगार सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन.

४. डॉ. दादासाहेब गोरे : भटके विमुक्त : जीवन आणि संस्कृती अक्षरगाथा वर्ष आठवे, अंक पहिला, नांदेड.

❑❑❑

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani